!! समान काम - समान वेतन - समान सेवा नियम - समान कार्यपध्दती !!

# करारसेवा कर्मचारी कल्याणकारी संघ, महाराष्ट्र राज्य

✵ Association Registration Number :- PUNE/0000845/2024 ✵

Udyam Reg No. : UDYAM-MH-26-0734857 PAN No. : AANAK6258N

## Contract Employee Welfare Association (CEWA), Maharashtra State

प्लॉट क्र. ५८ अ, PMT कॉलनी, श्री जय तुळजा भवानी माता सह.गृह. संस्था मर्या, बिबवेवाडी, पुणे - ३७

| | | | | |
|---|---|---|---|---|
| श्री. सुनिल शेलार<br>**अध्यक्ष** | श्री. दत्तात्रय चौगुले<br>**उपाध्यक्ष** | श्री. फराज सय्यद<br>**सचिव** | श्री. प्रदिप पाठक<br>**सह-सचिव** | श्री. सोमनाथ लामगुंडे<br>**खजिनदार** |
| E-mail :- cewa.maharashtra@gmail.com | | श्री. राजेश भटकर<br>**सदस्य** | श्री. गोरक्षनाथ भांगे<br>**सदस्य** | श्री. गजानन पंचलिंगे<br>**निमंत्रित सदस्य** |


जा.क्रं./प्रकरण-४/स्मार्ट/०३ दि. २२/०९/२०२४

प्रति,

मा.डॉ.हेमंत वसेकर साहेब भा.प्र.से.,

प्रकल्प संचालक,

स्मार्ट प्रकल्प, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**विषय :- मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पाचे संकेतस्थळावरिल नोंदविण्यांत आलेलेल्या तक्रार क्रमांक SMART_०००००००३३ विना-कार्यवाही बदं (Close) करण्यांत आलेबाबत .**

संदर्भ :- १) संघटनेची बैठक क्रं. ५ दिनांक १४/०४/२०२४ रोजीचे इतिवृत्तामधील मुद्दा क्रं. ८.

२) टी & एम कन्सल्टींग सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई यांना देण्यात आलेले पत्र दिनांक १४/०४/२०२४.

३) टी & एम कन्सल्टींग सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई यांना देण्यात आलेले पत्र दिनांक १३/०६/२०२४.

४) संघटनेचे पत्र क्रं. जा.क्रं./प्रकरण-४/स्मार्ट/०१ दि. २१/०८/२०२४

५) Grievance Id-SMART_०००००००३३ दि.२३/०८/२०२४

६) संघटनेचे पत्र क्रं. जा.क्रं./प्रकरण-४/स्मार्ट/०२ दि. २८/०८/२०२४

७) संघटनेचे पत्र क्रं. जा.क्रं./प्रकरण-४/स्मार्ट/०३ दि. १८/०९/२०२४

आदरणीय महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सविनय सादर करण्यांत येते की, कृपया संघटनेच्या संदर्भ क्रं. २ ते ७ चे निवेदनाचे अवलोकन व्हावे. सदरच्या निवेदनाच्या माध्यमातून मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत, टी & एम कन्सल्टींग सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई मार्फत प्रकल्पांतर्गत नियुक्त कंत्राटी अधिकारी / कर्मचारी यांचे बाबतीत अवलंबीत अनुचित कामगार प्रथांचे (Unfair Labour Practices) उच्चाटन करणेबाबत वेळो-वेळी संबंधीत मनुष्यबळ व्यवस्थापन संस्था (Outsourcing Agency) किंवा मुख्य नियोक्ता (Principal Employer as Project) यांचेकडे मागील ४ महिनेपासून संघटनेच्या वतीने पाठपुरावा करण्यांत येत आहे, परंतू, अदयाप आपणामार्फत कोणताही प्रतिसाद, आश्वासन किंवा निर्णय अद्याप प्राप्त झालेला नाही.

तसेच, सदरच्या गंभिरबाबी विषयी स्मार्ट प्रकल्पाचे https://smart-mh.org या संकेतस्थळावर Grievance Id-SMART_०००००००३३ दि.२३/०८/२०२४ अन्वये, तक्रार अर्ज सादर करण्यांत आला होता. सदरचा तक्रार अर्जाची प्रकल्पाचे संकेतस्थळावर सध्यस्थिती खालील प्रमाणे निदर्शनास येत आहे.



उपरोक्त Status चे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, संघटनेने सादर केलेल्या तक्रार अर्ज संघटनेस कोणताही माहिती किंवा कारण न कळवता, थेट Close करण्यांत आला आहे. तथापि, आपणास विनंती करण्यांत येते की, संघटनेच्या वतीने स्मार्ट प्रकल्पाचे संकेतस्थळावर नोंदविण्यांत आलेला तक्रार अर्ज क्रं. SMART_०००००००३३ कोणत्या नियम, कलम, तरतूदीचे अधिन राहून विना-कार्यवाही तथा संघटनेस कोणतेही पूर्व कल्पना किंवा कारण अवगत न करता बंद (Close) करण्यांत आला आहे, याबाबत कृपया संघटनेस अवगत करण्यांत यावे, ही विनंती.

आपले उत्तराचे प्रतिक्षेत . . . . . . .

कळावे, धन्यवाद !

**(सुनिल शेलार)** **(फराज सय्यद)**
**अध्यक्ष** **सचिव**

करारसेवा कर्मचारी कल्याणकारी संघ,
महाराष्ट्र राज्य

प्रत,

१) मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी सविनय सादर.
२) मा. अपर मुख्य सचिव, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी सविनय सादर.
३) मा. प्रधान सचिव, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी सविनय सादर.